Impact Factor-7.675 (SJIF)

ISSN-2278-9308

# B.Aadhar

Peer-Reviewed & Refreed Indexed

...inary International Research Journal

**March -2021**

ISSUE No- (CCLXX) 282








**Chief Editor**

**Director**
Aadhar Social
Research & Development
Training Institute Amravati

**Editor:**
Dr.Dinesh W.Nichit
**Principal**
Sant Gadge Maharaj
Art's Comm,Sci Collage,
Walgaon.Dist. Amravati.

**Executive Editor:**

Head, Deptt. of Economics,
G.S.Tompe Arts Comm,Sci Collage
Chandur Bazar Dist. Amravati

B.Aadhar

**This Journal is indexed in :**
- Scientific Journal Impact Factor (SJIF)
- Cosmos Impact Factor (CIF)
- International Impact Factor Services (IIFS)

For Details Visit To :

Aadhar PUBLICATIONS

# INDEX


| No. | Title of the Paper / Authors' Name | Page No. |
| --- | --- | --- |
| 1 | उदारीकरणाचा भारतीय समाज आणि अर्थव्यवस्थेवरील प्रभाव — डॉ. नितीन आहेर | 1 |
| 2 | नागपूर जिल्ह्यात गरीबीमुळे आणि परिसरात व्यवसायामुळे निर्मित होणारी बालमजूरी एक समस्या — डॉ. अलका यशवंत कोलमकर (खरीदे) | 5 |
| 3 | Covid - १९ चे समाज व्यवस्थेवरील परिणाम — डॉ.अब्बास एम.शकील | 9 |
| 4 | सामाजिक कार्याचे प्रेरणास्रोत — प्रा. डॉ. किर्ती सदार/रश्मी अरुण महाजन (वानोडे) | 14 |
| 5 | महिलांचे सक्षमीकरण व कायदे — प्रा.डॉ.किर्ती सदार/प्रभावती चं. चव्हाण | 18 |
| 6 | पाणलोट क्षेत्र विकासातून 'भूजल' व्यवस्थापन– एक भौगोलिक अभ्यास — प्रा. संजीव वि. भुसार | 23 |
| 7 | ग्रामीण महिलांच्या जलसमस्यांचा समाजशास्त्रीय अभ्यास — डॉ. प्रमिला हरीदास भुजाडे | 28 |
| 8 | भंडारा जिल्हा — डॉ. एस.एम. मैराम | 34 |
| 9 | संत शिरोमणी संत रविदासांचे सामाजीक कार्य — डॉ. मिलिंद बी. भगत/श्री. नितिन यु. अंबिलकर | 41 |
| 10 | महाराष्ट्र राज्यातील पिकाखालील क्षेत्र व उत्पादन एक भौगोलिक अभ्यास — डॉ. राजेंद्र भिमराव भालेराव. | 45 |
| 11 | खेळाडूला मानसिक कौशल्याच्या प्रशिक्षणाची गरज — प्रा.डॉ. नाजुकराम दिनानाथ बनकर | 51 |
| 12 | ग्रामीण ग्राहकांना मुलभुत व चैनीच्या वस्तूंचा खरेदी करताना यु–खरेदी करु करण्यात पंचायती राज संस्थांची व स्वंयसेवी ग्राहक संघटनाची भूमिका. — Mr. Chandrakant B. Dhumale | 54 |
| 13 | महिला सशक्तीकरण – एक दृष्टीक्षेप — डॉ.प्रदीप दामोदरराव दरवरे | 57 |
| 14 | सार्कची आठवी शिखर परिषद — डॉ. संतोष महादेवराव घुगे | 62 |
| 15 | नवीन शैक्षणिक धोरण २०२० व उच्च शिक्षणातील संशोधनाच्या दिशा. — प्रवीण एन. गेडाम / डॉ.हृषीकेश दलाई | 65 |
| 16 | आंबेडकरी क्रांतिबीजे पेरणारी युवराज गंगाराम यांची कविता — प्रा.डॉ.सुरेश खोब्रागडे | 69 |
| 17 | मराठी संतांची भक्तीसरीता — प्रा.डॉ. अजय कृ. खडसे | 75 |
| 18 | अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार — डॉ. लाजवंती टेंभुर्णे | 80 |
| 19 | पारंपारिक शिक्षणाद्वारे विद्यार्थ्यांच्या समायोजन क्षमतेचा विकास एक अभ्यास. — कृष्णा मा. माकोडे | 82 |

B.Aadhar' International Peer-Reviewed Indexed Research Journal
Impact Factor - (SJIF) –7.675, Issue NO, 282 (CCLXXXII)
ISSN : 2278-9308
March, 2021

# अण्णा भाऊ साठे यांचे आर्थिक विचार

डॉ. लाजवंती टेंभुर्णे
अर्थशास्त्र विभाग प्रमुख भारतीय महाविद्यालय, मोर्शी

अण्णा भाऊ साठे यांचे व्यक्तिमत्व एक लेखक, कार्यकर्ता आणि शाहीर म्हणून प्रसिद्ध पावले आहे. मार्क्सवादी विचारांच्या प्रारंभिक प्रभावातून त्यांचे लेखन फुलत गेले.महाराष्ट्राचा मॅक्झीम गोर्की हे त्यांना दिलेले विशेषण शोभुन दिसते. वाटेगाव ते मुंबई या प्रवासात त्यांचे अनेक टप्पे आणि स्थित्यंतरे पाहावयास मिळतात. तुकाराम भाऊ साठे ते अण्णा भाऊ साठे हा प्रवास थक्क करणारा आहे. 'माणूस' हे 'मूल्य' केंद्रस्थानी ठेऊन साहित्य निर्माण करणारा लेखक हे बिरूद त्यांनी मिरविले. रूढ अर्थाने अणा भाऊ साठे आर्थिक विचारधारेचे काटेकोर अभ्यासक आहेत, असे म्हणता येणार नाही. परंतु त्यांचे विचार दलित, शोषीत, पिढीत आणि वंचितांच्या बाजुचे होते. आर्थिक विचारांचा अीयास त्यांनी केला होता. वर्गवादी विचारांची पायाभरणी मार्क्सवादातुन झाली होती. त्यांच्या कथा, कादंबऱ्या शाहीरीमधुन आणि केलेल्या भाषणामधुन त्यांचे आर्थिक विचार आपणास कळतात. हे जग भांडवलदारांनी—सरंजामदारांनी आपल्या बाजुला वळवून घेतले आहे. ही गरीबी ईश्वरनिर्मीत नसुन ती मानव निर्मित आहे. यावर त्यांचा ठाम विश्वास होता. म्हणुनच ते म्हणतात, '' हे जग ही पृथ्वी शेषाच्या मस्तकावर तरली नसुन दलीतांच्या तळहातावर तरलेली आहे. अशा या दलीतांचे जिवन खडकातुन झिरपणाऱ्या पाझंरा प्रमाणे असते. ते जवळ जाऊन पहा आणि मग लिहा''[१]. स्वत: अण्णा भाऊ साठे यांनी दारिद्रय, गरीबीमध्ये दिवस काढल्यामुळे त्यांना गरीबीची आणि गरीबांची जाणीव होती. ते त्यांच्या कादंबऱ्या, कथा, नाटक तथा लावणी, शाहीरीमधुन दिसुन येते. त्यांच्या मुंबईची लावणी या लावणीतुन लाल झेंडयाचा म्हणजे साम्यवादी विचारांचा पुनरूच्चार केला आहे.

'' लाल झेंडा घेऊन हाती । करायला इथे क्रांती ।
मजुरांची पिढी नवी पाऊले टाकती ।।
अण्णा भाऊ साठे म्हणे । बदलुनी हे दुबळे जिणे।
होणार जे विजयी ते रण करती।।'' [२]

देशाला स्वातंत्र्य मिळुनही खऱ्या अर्थाने येथील मजुर स्वतंत्र झाला नाही. ही खंत त्यांनी प्रस्तुत कवितेतुन मांडली. आणि लाल झेंडा हाती घेतला पाहिजे हा क्रांतीकारक विचार मांडला.

माटुंग्यातील लेबर कॅम्प मध्ये त्यांचे जिवन गेले. चिरागनगर मध्ये राहतांना त्यांना कोणी विचारले ' येथे का बरे राहता' तेव्हा त्यांनी '' माझ्या कथा कादंबऱ्या येथील जग पाहुन लिहील्या'' असे म्हटले होते. कारण त्यांची नाळ येथील मजुर— कष्टकरी वर्गाशी जुळलेली होती. भांडवलदार—सरंजामदार येथील जनतेला लुटून तुंबडी भरतात. तसेच येथील ब्रिटीश सरकारने लुटीचे धोरण अवलंबीले होते. त्यामुळे सन १९१० च्या काळातील फकीराचे चित्रण त्यांनी केले. ज्या फकीराला उत्तुंग यश लाभले आणि अण्णा भाऊंचे नाव जगभर पोहचले. त्यांच्या लिखानाची प्रेरणा मॅक्झीम गोर्की होते. जे स्वत: गरीबीतुन वर आले होते तसेच जे साहित्यीक आपल्या लेखनातुन केवळ रंजनवाद स्विकारतात त्यांना नाकारले आहे. अण्णा भाऊ साठे जिवनवादी लेखक होते. ते म्हणतात जो कलावंत जनतेबरोबर असतो त्याचाच बरोबर ती जनता असते. जनतेकड पाठ फिरवणाऱ्याकडे साहित्यही पाठ फिरवते. जगातील सर्वश्रेष्ठ कलावंतानी वाङमय हा जगाचा तिसरा डोळा मानला आहे. आणि तो डोळा सदैव पुढे नि जनतेबरोबर असणे जरूर आहे.''[३]

ISSN : 2278-9308
March, 2021

साहित्य भुमिका आर्थिक विचारांची साक्ष पटविण्या पुरेशी आहे. साहित्यीकांनी आपल्या समाजाकडे पाठ फिरवू नये, हा आंबेडकरी विचारही त्यात दिसुन येतो.

अण्णा भाऊ साठे यांचा आर्थिक विचार मार्क्सवाद—आंबेडकरवाद यांच्या समन्वायातुन साकार झाला आहे. वर्ग—वर्ण—जात ही समाजात दिसुन येणारी वस्तुस्थिती आहे. आज दलितत्व आणि दलित कुठे आहे? असा प्रश्न निर्माण करणारी माणसे प्रत्यक्षात जात—धर्म—वर्गापासुन दुर गेलेली नाहीत. जर जात—वर्ग अस्तित्वात आहेत, तर त्यांचे प्रश्नही अस्तित्वात आहेत. त्यांना नजरेआड करून चालणार नाही असे अण्णा भाऊंचे म्हणणे होते.

कलेसंदर्भात बोलतांना अण्णा भाऊ म्हणतात "कला ही वर्गातीत असावी प्रचारातीत असावी असा त्यांचा दावा असतो आणि अशा या कलावंताचा आज बोलबालही कमी नाही. परंतु जे जनतेला जाणत नाही तो तिला विद्रुप करतो. त्यांचे नमुने आज मराठी साहित्यात मुबलक मिळतात. " [४] कला ही व्यक्तिसापेक्ष— कालसापेक्ष— समुहसापेक्ष असते त्यांचे मत होते. ज्या वर्गातुन जी व्यक्ती निर्माण होते त्याचे भलेबुरे परिणाम त्याच्यावर होत असतात. व्यक्तीही समाजाची अपत्य आहे. आणि त्या व्यक्तीची विचारसरणी त्याच्या घडवणुकीवर अवलंबुन असते.

मार्क्सवादी विचारांचा प्रभाव व त्यातुन केलेले लेखन हे अण्णा भाऊंच्या साहित्याचा आणि आर्थिक विचारांचा परिपाक आहे. ज्या कामगारांना कितीतरी कष्ट करावे लागते त्यांना पोटभर अन्नसुध्दा मिळत नाही. याचे कारण या वर्ग व्यवस्थेत आहे, असे त्यांचे मत होते.

फकिरा ही कांदबरी त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या लेखणीला अर्पण केली. सुरवातीच्या काळात अण्णा भाऊवर कार्ल मार्क्सचा प्रभाव आणि नंतरच्या काळात डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचा प्रभाव दिसुन येतो. म्हणुनच ते म्हणतात—

" जग बदल घालुनि घाव ।  
सांगुन गेले मज भिमराव।  
गुलामगीरीच्या या चिखलात।  
रूतुन बसला का ऐरावत ।  
नव महाराष्ट्रा निर्मुन जगती ।  
करी प्रकट निज गाव।" [५]

अशी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांप्रति निष्ठा बाळगतात. डॉ. आंबेडकरांनी दलित शोषीतांसाठी जे कार्य केले होते त्यांचा प्रभाव अण्णा भाऊ साठेवर पडले होते. कारण स्वतः अण्णा भाऊ साठे यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे कार्य जवळून पाहिले होते. अण्णा भाऊ साठे शेवटपर्यंत खालच्या—तळाच्या वर्गाशी एकनिष्ठ राहून कलाकृती निर्माण करणारा लेखक, कवी, शाहीर, कलावंत असुन वर्ग आणि वर्ण यांची मिमांसा करणारा आहे. कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या समनवयातुन निर्माण झालेला विचार त्यांचा कथा, कादंबरी आणि भाषणातुन प्रखरपणे व्यक्त होतो. अण्णा भाऊ साठे हे खऱ्या अर्थाने कार्ल मार्क्स आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचे प्रवक्ते ठरतात, यात शंका नाही.

**संदर्भ टिपा :—**

१. अर्जुन डांगळे (संपादक), लोकशाहीर अण्णा भाऊ साठे निवडक वाङमय, दु.आ., महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई, २००१, पृ.११६७  
२. तत्रैव, पृ. ६५  
३. तत्रैव, पृ. ११७७  
४. तत्रैव, पृ. ११७७  
५. तत्रैव, पृ. ६३